(41)

No. Authority/IV/1227

Bombay Metropolitan Region
Development Authority,
18th Floor, New Administrative
Offices Building, Madame Cama Road,
Opp. Sachivalaya, Bombay-400 021.

Date : 8th March 1976,

Dear Sir/Madam,

I am to forward herewith the minutes of the fourth meeting of the Authority held on 14th February 1976.

Yours sincerely,
K.V.Seshadri
(K.V. Seshadri).

To

All members.

43

# Minutes of the Fourth Meeting of the BMRDA held on 14th February 1976

1. The list of members present is annexed. Annexure 'A'.

2. The meeting began with an address by the Chairman.

A copy of the address was circulated to the members. Annexure 'B'.

3. Item No.1: Confirmation of the minutes of the third meeting.

RESOLUTION 48 :

The minutes of the third meeting held on 21st November 1975 were confirmed.

Item No.2 : Action taken on the minutes of the last meeting.

RESOLUTION 49:

(1) The action taken was noted.

(2) With reference to Resolution 47(2), the General Manager, Bombay Telephones, clarified that the proposal of micro-wave link between New Bombay and South Bombay was expected to be ready for decision making in another two to three months.

Item No.3 : Allowances to members Regulations/adoption of -

RESOLUTION 50 :

(1) In partial modification of the Resolution 12, the Authority took note of the Bombay Metropolitan Region Development Authority (Allowances to Members) Regulation, 1975, as approved by Government and in the form appended to the Agenda note, subject to the following :

(i) It was decided that the Metropolitan Commissioner should draw the attention of Government to the fact that the Regulations need to be amended to provide for meetings held outside Bombay district and that the members from Greater Bombay ought to be eligible for travel expenses (on a 'pari passu' basis) on such occasions;

(ii) The members present and eligible were paid at Rs.50/- towards personal expenditure per meeting attended by each member. All the members were requested to furnish travel and other particulars in writing to the Metropolitan Commissioner for working out the sums, if any,

due to them additionally under the Regulations, for the present as well as the earlier meetings.

Item No. 4 : Travelling allowance and Daily allowance Regulations.

RESOLUTION 51 :

In partial modification of Resolution 36, the Authority approved the Travelling Allownce and Daily Allowance Regulations as appended to the Agenda note.

Item NO. 5 : Delegation of powers.

RESOLUTION 52 :

The Authority decided that (i) the proposal in respect of delegation of povers should first be examined by a Committee consisting of the following and that their views and suggestions should be available to the Authority at its next meeting for deciding the matter,:-

Shri N.M. Wagle - Chairman

Shri S.S. Dighe

Shri Hans Bhugra

Shri Sudhir Joshi

Shri D.B. Patil

Municipal Commissioner

Metropolitan Commissioner.

(ii)pending approval of the delegation of powers by the Authority, the Chairman was authorised to make such urgent appointments as may be necessary, the action so taken being reported to the Authority ex-post facto.

Item No. 6 : Regional Development Programme of the BMRDA

RESOLUTION 53 :

The Authority approved the proposed Regional Development Programme in broad outline, subject to the following :

(i) It was noted that Metropolitan Commissioner could not submit the budget of the Authority till

Government decided the finances to be provided, i.e. "contributions" to be made by it, under the BMRDA Act, 1974;

(ii) There is no objection in principle to the routing of all funds provided in Government **budgets** (Central and State) for urban development schemes in the Metropolitan Region through the Authority, so as to provide unified monitoring and review of the Region's development;

(iii) The Authority has no objection in principle to the levy of ½% service charges on the loans and advances passing through it as above, for covering its own administrative axpenses partially;

(iv) The Chairman was authorised to appoint a group of knowledgeable persons to suggest remunerative schemes which the Authority could undertake for augmenting its Revolving Fund rapidly and progressively.

Item No. 7 : Loan assistance to MAFCO for marketing activities in New Bombay.

RESOLUTION 54 :

The Authority resolved that -

(i) The MAFCO Ltd., a Government of Maharashtra enterprise, be sanctioned a loan of Rupees Twentyfive lakhs to be disbursed during the current financial year (before 31st March 1976) for the purpose of developing an Agricultural Produce Market Complex at Turbhe,

(ii) The said loan shall be repaid in full on the expiry of two years from the date of drawal and carry interest at 12 per cent per annum. The other terms and conditions of the loan regarding guarantee etc. shall be decided by the Executive Committee, and

(iii) The disbursement shall be made from the Authority's BMRD Fund. The Metropolitan Commissioner was authorised, if required, to seek an overdraft from the State Bank of India or the Bank of India or the Bank of Maharashtra

sufficient to finance the above scheme against the pledge of Authority's deposits with them and to approve, finalise, sign, execute and negotiate the documents required for the said purpose on each occasion.

Item No.8 : Loan assistance to Housing Board for upgradation of slum housing.

RESOLUTION 55 :

The Authority resolved that the scheme should be referred to t he Executive Committee for further consideration, as (1) it would not generate any supluses and (2) the Maharashtra Housing Board had not yet considered the scheme or passed a formal Resolution to seek assistance from the BMRDA on behalf of the Slum Improvement Board.

Item No. 9 : Land Development Schemes in new Growth Centres.

RESOLUTION 56 :

The Authority resolved that -

(i) The Bhiwandi-Nizampur Municipal Council could be sanctioned a loan of Rs. 40 la khs to be disbursed as per the mutually agreed programme for the purpose of Area Development in the Bhiwandi Municipal limits;

(ii) A detailed technical-cum-financial appraisal of the scheme should be got done by the Metropolitan Commissioner making necessary modifications in the plan of the scheme to make it consistent with the objectives of the BMRDA;

(iii) The terms and conditions of the loan covering the interest-rate, repayment period, guarantee, if any, etc., shall be decided by the Standing Committee;

(iv) Based on the appraisal report the disbursement of the loan should be made from the Authority's BMRD Fund; and

(v) The Metropolitan Commissioner should approach the State Government for getting adequate finance for supporting the scheme from the State Government's Plan funds and/or the Government's plan funds for integrated urban development in the Metropolitan Region.

Area Development Scheme at Khopoli

RESOLUTION 57 :

The Authority resolved that -

(i) The Metropolitan Commissioner should arrange to get the land development scheme submitted by the Khopoli Municipality technically and financially appraised;

(ii) based on this report, the Standing Committee may sanction the loan required by the Municipality;

(iii) The terms and conditions of the loan covering the interest-rate, repayment period, guarantee, if any, etc. shall be decided by the Standing Committee;

(iv) The disbursement may be made from the Authority's BMRD Fund on a mutually agreed programme; and

(v) The Metropolitan Commissioner after sanction of this loan should approach the State Government/Government of India for obtaining Plan finance assistance from the Plan funds earmarked for integrated urban development in Metropolitan areas.

Item No. 10 : Accounting Procedure & Principles and appointment of Staff.

RESOLUTION 58 :

(1) The Authority considered the Agenda note and directed that the accounting procedure and principles contained therein should be adopted by the BMRDA in the form of suitable Regulations under Section 22(1) of the BMRDA Act, 1974. It authorised the Standing Committee to finalise these Regulations on its behalf and bring them into force as soon as possible.

(2) The Authority approved the appointment of a Financial Adviser preferably an officer on deputation from the Indian Audit & Accounts Service, as well as one Chief Accounts Officer and one Accounts Officer with the minimum supporting staff thereunder required for the initial formation of the

Accounts Department o f the Authority. Whenever the staff is intended to be taken on deputation from Government, local authority or a public enterprise, it authorised the Executive Committee to make the appointments with the approval of the Chairman. If it is found that the Chief Accounts Officer or the Accounts Offcer has to be recruited from the local market, it authorised the standing Committee to consider the requisite proposal and to take appropriate decisions for recruiting and appointing.

(3) The Committee of members appointed by Resolution 52 should also advise on the organisational structure of the Accounts and Finance Department.

Item No. 11 : Staffing of Functional Boards.

RESOLUTION 59 :

(1) The Authority decided that this item should be also referred to the Committee of members appointed by Resolution 52 and reconsidered with its advice at the next meeting.

(2) Pending final consideration of the propo al by the Authority, the Chairman was authorised to make such urgent appointments as may be necessary, the action so taken being reported to the Authority ex-post facto.

Item No. 12 : Matters relating to land use in Bombay.

RESOLUTION 60 :

The Authority considered the note and resolved that the item should be referred to a Committee consisting of :

The Mayor of Bombay - Chairman
The Chief Secretary

Shri V.S. Mahadik, Chairman, Standing Committee, B.M.C.

Shri N.P. Thakkar, Chairman, Improvements Committee, B.M.C.

Shri C.S. Mehta, Chairman, BEST Committee.

Shri Hansraj Bhugra.

Shri Pushpakant Mhatre.

Shri Hashu Advani.

Shri Sudhir Joshi.

(49)

Shri Manohar Joshi.

Shri M.A. Khandwani.

Shri S.J. Kohli.

Shri V.K. Tembe.

Smt. Kamala Raman.

Shri S.S. Kighe.

Shri G.N. [illegible]anatwala.

Shri G.B. Kanitkar.

Shri J.C. Agarwal, Chairman, B.P.T.

The Municipal Commissioner Bombay.

The Metropolitan Commissioner, Bombay.

The item should be placed again before the Authority along with the advice of the Committee at its next meeting.

Item No. 13 : Delegation of Statutory Duties and Functions.

RESOLUTION 61 :

The Authority resolved that, for ensuring an efficient and action-oriented performance of the statutory duties and functions of the Authority -

(i) The duties and functions will be performed by the three tiers of the Authority, viz. the Standing Committee, the Executive Committee and the Functional Boards as detailed in the Annexure. to the agenda note.

(ii) Based on the brief procedure indicated for each delegation the concerned tier of the Authority may formulate a detailed procedure for an efficient performance of the related statutory function/duty.

(iii) The actions taken by the Standing Committee, the Executive Committee and the Functional Boards under these delegations shall be deemed to be the actions of the Authority.

(iv) All statutory powers not explicitly covered in this delegation shall be exercised by the Authority unless delegated subsequently.

(v) The Authority alone is competent to resolve any issues concerning doubts and ambiguities relating to this or subsequent delegations.

(iv) In the event of any amendment to the Act affecting the duties, functions or powers of the Authority, the related delegation made herewith would stand cancelle d forthwith till the revised duties, functions or powers are delegated by the Authority.

(57)

Annexure 'A'

List of Members present at the
4th Meeting held on 14th
February, 1976

Dr. Rafiq Zakaria,
Minister for urban Development.

Shri Nanalal D. Mehta,
Mayor of Bombay,

Shri M.D. Chaudhari,
Minister for Finance.

Shri N.M. Tidke,
Minister for industries.

Shri V.S. Mahadik.

Shri Hansraj Bhugra,

Shri Pushpakant A. Mhatre,

Shri Sudhir Joshi,

Shri Sohan Singh Kohli,

Dr. M.G. Parulekar ,

Shri D.K. Khanvilkar,

Shri V.K. Patil,

Shri V.K. Tembe,

Smt. Kamala Raman,

Shri S.S. Dighe,

Shri G.N. Banatwala,

Shri D.B. Patil,

Shri S.D. Baswant

Shri N.M. Wagale,

Shri J.C. Agarwal,

Shri M.S. Muthanna,

Shri M.A. Khandwani,

Shri Manohar G. Joshi,

Shri Hashu Adwani.

Shri C.M. Correa.

Shri N.G.K. Murthi.

Shri B.G. Deshmukh.

Shri D.N. Patil.

Annexure - B

(53)

Text of the speech of the Chairman, BMRDA, Dr. Rafiq Zakaria, at the fourth meeting to be held on 14th February 1976.

..

I am glad to welcome you to this meeting. Perhaps it has been called at short notice and the agenda papers have also reached you only a few days ago. This was because the office has been busy with the work relating to the current visit of the Appraisal Mission of the World Bank for the Bombay Urban Transport Project. I am sure that in future we will be able to adhere to our normal regulations, namely that the papers will be despatched 10 days in advance of the meeting.

2. The World Bank Mission has almost completed its work and will be winding up its visit in a few days time. They have taken keen interest in progressing the project and the connected loan. It is our expectation that this will materialise in the fiscal year of the Bank beginning July, 1976, and will flow through the B.M.R.D.A. I would like to thank the members of the Mission for the interest that they have shown in the course of their work all this time.

3. The three Functional Boards also met me jointly on the 7th instant. This gave me an opportunity of meeting all of them in person and also make each person known to the other. They will now be concentrating on their respective tasks, but I feel that it would be better to have joint meetings every few months so that the planning of the Region is undertaken on an overall basis, with each sector merging with the other harmoniously.

4. Among the items of the agenda for to-day's meeting you will notice that there are three of interest to the development of the Region. The largest and perhaps the most significant relates to the residents of the slum colonies on Government and municipal lands where improvements have already been undertaken by the Slum Improvement Board, to help them in reconstructing their dwellings to the desired layout and to a satisfactory design. At the rate of Rs.4000/- per dwelling, a sum of Rupees one crore should enable 2500 units to come up annually. By a process of rotation, the same amount could enable more and more units to be reconstructed in the years to come. This is in keeping with the concept of Sites and Services in which the Government of India has shown keen interest for some time past; it promotes the principle of self-interest among the residents and encourages them to build up their savings in life. The Authority may discuss this subject and perhaps like to recommend it to the State Government for consideration as a Plan Scheme, to be covered by Section 18(1)(a) of the Act.

5. The second significant loan to be considered is to the MAFCO for accelerating the construction of the new wholesale markets at Washi. This would considerably assist in the decongestion of parts of south Bombay and also its streets from the traffic with movement into the City daily and movement out of **trucks** in order to carry potatoes and onions to the suburbs and even to the other places beyond. This step will also undoubtedly promote the growth of New Bombay faster than it has been able to achieve so far.

6. A third such item which we would be discussing relates to two specific programmes proposed by the Bhiwandi and Khopoli municipalities for development of select areas in their jurisdiction. These had been presented by them earlier to HUDCO through the State Government but they required review as advised by HUDCO. However, they may be appropriate for the B.M.R.D.A. to deal with, as they are in the nature of area development schemes. The plans may however have to be re-drawn in order to create smaller plots in keeping with the current costs of building construction.

7. The other matters on the agenda today relate to the accounting system to be followed by the Authority and the powers to be delegated both under the law and administratively to the various Committees and functionaries under the Authority.

.. ..

11

55

429

क्रमांक: प्राधिकरण - ४ - १२७,
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
१८ वा मजला, न्यु ॲडमिनिस्ट्रेटिव्ह बिल्डींग,
मॅदाम कामा रोड, मुंबई.
दिनांक १२ मार्च १९७६.

प्रिय महोदय - महोदया,

सोबत प्राधिकरणाच्या दिनांक १४-२-१९७६ रोजी झालेल्या चौथ्या सभेच्या कार्यवृत्ताची प्रत पाठवत आहे.

आपला विश्वासु,
का. वें. शेशाद्री
( का. वें. शेशाद्री )
महानगर आयुक्त.

प्रति:

सर्व सदस्य.

: मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
१४ फेब्रुवारी १९७६ रोजी भरलेल्या चौथ्या
बैठकीचे कार्यवृत्त :

१. बैठकीस उपस्थित असलेल्या सदस्यांची सूची सोबत जोडली आहे. (जोडपत्र 'अ').

२. बैठकीच्या प्रारंभी अध्यक्षांचे भाषण झाले. भाषणाची प्रत सदस्यांमध्यें फिरविण्यात आली होती. (जोडपत्र 'ब').

३. बाब क्र.(१): तिसऱ्या बैठकीच्या कार्यवृत्तास पुष्टी देणे.

ठराव (४८) : २१ नोव्हेंबर १९७५ च्या तिसऱ्या बैठकीच्या कार्यवृत्तास पुष्टी देण्यात आली.

बाब क्र. (२) : मागील बैठकीच्या कार्यवृत्तांवर कार्यवाही करणे.

ठराव (४९) : १) केलेल्या कार्यवाहीची नोंद करण्यात आली.
२) ठराव ४७(२) च्या संदर्भात, नवी मुंबई व दक्षिण मुंबई यांच्या दरम्यान मायक्रोवेव्ह लिंक टाकण्याबाबतचा प्रस्ताव येत्या दोन तीन महिन्यात तयार होईल अशी अपेक्षा आहे असे बॉम्बे टेलिफोन्सच्या महाव्यवस्थापकांनी स्पष्ट केले.

बाब क्र. (३) : सदस्यांना भत्ते देण्याबाबतच्या विनियमांचा अवलंब करणे.

ठराव (५०) : १) शासनाने मान्यता दिलेल्या व कार्यसूचीस जोडलेल्या नमुन्यातील मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सदस्यांना भत्ते देण्याबाबत) विनियम, १९७५ ची नोंद ठराव १२ मध्यें सुधारणा करुन प्राधिकरणाने घेतली असून ती खालील गोष्टींच्या अधीन असेल:-
(एक) असे ठरवण्यात आले की, मुंबई जिल्ह्याबाहेर भरणाऱ्या बैठकीसाठी तरतूद करण्याकरिता विनियमांमध्यें दुरुस्ती करण्याची गरज आहे आणि अशा प्रसंगी, बृहन्मुंबईतून येणाऱ्या सदस्यांना प्रवास भत्ता मिळण्यास समानतया पात्र समजले पाहिजे या गोष्टीकडे महानगर आयुक्तांनी शासनाचे लक्ष वेधावे;
(दोन) उपस्थित असलेल्या आणि पात्र असलेल्या सदस्यांपैकी प्रत्येक बैठकीस उपस्थित राहिलेल्या प्रत्येक सदस्यास व्यक्तिगत खर्च म्हणून रु.५०-०० याप्रमाणें रक्कम देण्यात आली. विनियमांनुसार चालू बैठकीकरिता तसेच, त्यापूर्वीच्या बैठकींकरिता सदस्यांना आणखी

कोणत्याही रकमा देय होत असल्यास त्या काढण्यासाठी सर्व सदस्यांनी आपल्या प्रवासासंबंधीचा आणि इतरही तपशील लेखी सादर करावा अशी त्यांना विनंती करण्यात आली.

बाब क्र.(४) : प्रवासभत्ता व दैनिक भत्ता याबाबत विनियम.

ठराव (५१) : ठराव ३६ मध्ये कांही सुधारणा करताना प्राधिकरणाने, कार्यसूचीस जोडल्याप्रमाणे प्रवास भत्ता व दैनिक भत्ता याबाबतच्या विनियमास मान्यता दिली.

बाब क्र.(५) : शक्ती प्रदान करणे.

ठराव (५२) : प्राधिकरणाने ठरविले की (एक) अधिकार प्रदान करण्याबाबतचा प्रस्ताव प्रथम, खालील सदस्यांच्या समितीने तपासून पहावा आणि तिच्या पुढील बैठकीत त्यावर निर्णय घेण्यासाठी त्यांनी प्राधिकरणास आपले विचार व सूचना कळवाव्या :-

श्री एन्. एम्. वागळे - अध्यक्ष.
श्री एस्. एस्. दिघे.
श्री हंस भुग्रा.
श्री सुधीर जोशी.
श्री डी. बी. पाटील.
नगरपालिका आयुक्त.
महानगर आयुक्त.

(दोन) प्राधिकरणाकडून अध्यक्षास अधिकार प्रदान करण्यास मान्यता मिळेपर्यन्त, आवश्यक असतील त्याप्रमाणे तात्डीने नेमणुका करण्यासाठी अध्यक्षास प्राधिकृत करण्यात आले, मात्र अशा प्रकारे केलेली कार्यवाही प्राधिकरणास कार्योत्तर कळवावी.

बाब क्र.(६) : मुंबई महानगर विभाग विकास प्राधिकरणाचा प्रादेशिक विकास कार्यक्रम.

ठराव (५३) : प्राधिकरणाने प्रादेशिक विकास कार्यक्रमाच्या स्थूल आराखड्यास मंजुरी दिली असून ती खालील गोष्टींच्या अधीन आहे :-

(एक) शासनाने पुरवावयाचा पैसा म्हणजेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ याखाली द्यावयाचे 'अंशदान' निश्चित होईपर्यन्त महानगर आयुक्त, प्राधिकरणाचे अर्थसंकल्पीय अंदाज सादर करु शकत नाहीत ह्याची नोंद घेण्यात आली;

...३

(दोन) एकत्रितपणे संनियंत्रण ठेवण्यासाठी व विभागाच्या विकासाचा आढावा घेण्यासाठी, महानगर प्रदेशातील नागरी विकासाच्या योजनांकरिता शासकीय अर्थसंकल्पात (केंद्रीय व राज्य) पुरवलेले सर्व निधी या विकासाकडे वळवण्यास तत्वत: हरकत नाही;

(तीन) प्राधिकरणाचा प्रशासनिक खर्च अंशत: भागवण्यासाठी वरील-प्रमाणे त्याच्यामार्फत देण्यात येणा-या कर्जावर व आगाऊ रकमां वर $\frac{1}{2}$ टक्का सेवा खर्च आकारण्यास प्राधिकरणाची तत्वत: हरकत नाही;

(चार) प्राधिकरण आपला परिक्रामी निधी (रिव्हॉल्व्हिंग फंड) झपाट्याने व वाढत्या क्रमाने वाढवण्याकरिता ज्या लाभकारी योजना हाती घेऊ शकेल अशा योजना सुचवण्यासाठी लागणा-या तज्ञ व्यक्तींची नेमणूक करण्याकरिता अध्यक्षांस प्राधिकृत करण्यात आले.

बाब क्र.(७): नव्या मुंबईतील खरेदी-विक्रीच्या कामांसाठी मॅफकोला कर्ज सहाय्य.

ठराव (५४) : प्राधिकरणाने ठराव केला की -

(एक) तुर्भे येथील शेतमाल बाजार - समूह वाढवण्यासाठी चालू वित्तीय वर्षात (३१ मार्च १९७८ पूर्वी) द्यावयाचे पंचवीस लाख रुपयांचे कर्ज मॅफको मर्यादित या महाराष्ट्र शासनाच्या उपक्रमास मंजूर करावे

(दोन) वरील कर्ज घेतल्याच्या तारखेपासून दोन वर्षांपर्यंत त्याची पूर्णपणे परतफेड करावयाची आहे व त्यावर दरसाल १२ टक्के व्याज असेल. हमी, इ. बाबतच्या कर्जासंबंधीच्या इतर अटी व शर्ती कार्य-कारी समितीकडून ठरवण्यात येतील, आणि

(तीन) संवितरण प्राधिकरणाच्या मुंबई महानगर प्रदेश प्राधिकरण निधीतून करण्यात येईल. वरील योजनेस पुरेसा पैसा पुरवण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडियाकडे किंवा बँक ऑफ इंडियाकडे किंवा बँक ऑफ महाराष्ट्रकडे असलेल्या प्राधिकरणाच्या ठेवी तारण म्हणून ठेवून त्यावर अधिकर्ष (ओव्हर ड्राफ्ट) मिळवण्यासाठी व प्रत्येक प्रसंगी उक्त प्रयोजनासाठी आवश्यक त्या दस्तऐवजास मान्यता देणे, त्यास अंतिम स्वरुप देणे, स्वाक्षरी करणे, व डॉक्युमेंट करणे या कामासाठीही महानगर आयुक्तांस प्राधिकार देण्यात आले होते.

बाब क्र.(८) : गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करण्यासाठी गृहनिर्माण मंडळास कर्ज सहाय्य.

ठराव (५५) : प्राधिकरणाने असा ठराव केला की - (१) यातून अधिक उत्पन्न मिळ-णार नसल्यामुळें आणि (२) महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळाने अद्यापही या योजनेवर विचार केला नसून गलिच्छ वस्ती सुधार मंडळाच्या वतीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सहाय्य मिळवण्यासंबंधी एखादा औपचारिक ठराव संमत केला नसल्यामुळे, ही योजना पुढील विचारासाठी कार्यकारी समितीपुढे ठेवावी.

बाब क्र.(९) : नवीन विकास केंद्रामधील जमीन विकास योजना.

ठराव (५६) : प्राधिकरणाने ठराव केला की -

(एक) भिवंडी नगरपालिका हद्दीतील क्षेत्रविकासासाठी असलेल्या परस्पर संमत कार्यक्रमानुसार भिवंडी - निजामपूर नगरपालिकेस रु. ४० लाख इतके कर्ज मंजूर करता येईल ;

(दोन) योजनेचा आराखडा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणा-च्या उद्दिष्टांशी सुसंगत करण्याच्या दृष्टीने आवश्यक असलेले फेरबदल करून योजनेचे तपशीलवार तांत्रिक - नि - वित्तीय मूल्यांकन महानगर आयुक्तांनी करवून घ्यावे;

(तीन) व्याजाचा दर, परतफेडीचा कालावधी, कोणतीही हमी असल्यास ती हमी, इत्यादींचा समावेश असलेल्या कर्जाच्या अटी व शर्ती स्थायी समितीकडून निश्चित करण्यांत येतील;

(चार) मूल्यांकन अहवालावर आधारित असलेले कर्जाचे वितरण प्राधि-करणाच्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण निधीतून करण्यात यावे;

(पाच) महानगर विभागातील एकात्मीकृत नागरी विकासासंबंधीच्या राज्य शासनाच्या योजनांतर्गत निधीद्वारे आणि / किंवा भारत सरकारच्या योजनांतर्गत निधीद्वारे या योजनेस पुष्टी देण्यासाठी पुरेसा पैसा मिळावा म्हणून महानगर आयुक्तांनी राज्य शासनास विनंती करावी.

खोपोली येथील क्षेत्र विकास योजना :

ठराव (५७) : प्राधिकरणाने असे ठराव केले की -

(एक) खोपोली नगरपालिकेकडून तांत्रिक - नि - वित्तीय मूल्यांकन केलेली जमीन विकास योजना सादर केली जाण्याची व्यवस्था महानगर आयुक्तांनी करावी;

(दोन) या अहवालाच्या आधारावर नगरपालिकेस आवश्यक असलेले कर्ज स्थायी समिती मंजूर करू शकेल;

...५

(तीन) व्याजाचा दर, परतफेडीचा कालावधी, कोणतीही हमी असल्यास ती हमी, इत्यादींचा समावेश असलेल्या कर्जाच्या अटी व शर्ती स्थायी समितीकडून निश्चित करण्यात येतील;

(चार) कर्जाचे वितरण प्राधिकरणाच्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण निधीतून, परस्पर संमत कार्यक्रमानुसार करता येईल ;

(पाच) हे कर्ज मंजूर केल्यानंतर, महानगर क्षेत्रातील एकात्मीकृत नागरी विकासासाठी राखून ठेवलेल्या योजनांतर्गत निधीतून वित्तीय सहाय्य मिळवण्यासाठी महानगर आयुक्तांनी राज्य शासनास / केंद्र शासनास विनंती करावी.

बाब क्र.(१०): हिशोब ठेवण्याची पध्दति, तत्वे आणि कर्मचारी वर्गाची नेमणूक.

ठराव (५८) : (१) प्राधिकरणाने कार्यसूचीच्या टिप्पणीवर विचार केला आणि त्यात समाविष्ट असलेली हिशेब ठेवण्याची पध्दति आणि तत्वे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम २२(१) खालील योग्य अशा विनियमांच्या स्वरुपात स्वीकृत करावी असे आदेश दिले. त्याने आपल्या वतीने, स्थायी समितीला या विनियमांना अंतिम स्वरुप देण्याचे आणि शक्य तितक्या लवकर ते अंमलात आणण्याचे अधिकार प्रदान केले आहेत.

(२) प्राधिकरणाने भारतीय लेखापरीक्षा व लेखा सेवेतील प्रतिनियुक्तीवर घेतलेल्या अधिका-याची वित्तीय सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास आणि प्राधिकरणाच्या अकौंटस् विभागाची प्रारंभिक रचना करण्यासाठी आवश्यक असलेल्या किमान आधारभूत कर्मचारी वर्गासह एक मुख्य हिशोब अधिकारी आणि एक हिशेब अधिकारी यांची नेमणूक करण्यास संमति दिली आहे. जेव्हा जेव्हा, सरकारकडून, स्थानिक प्राधिकरणाकडून किंवा सरकारी उपक्रमाकडून प्रतिनियुक्तीवर कर्मचारीवर्ग घ्यावयाचा असेल तेव्हा प्राधिकरणाने अध्यक्षांच्या संमतीने त्याची नेमणूक करण्यास कार्यकारी समितीला अधिकार प्रदान केले आहेत. स्थानिक क्षेत्रातूनच, मुख्य हिशोब अधिका-याची किंवा हिशेब अधिका-याची भरती करावयाची असेल तेव्हा, प्राधिकरणाने त्या बाबतच्या आवश्यक त्या प्रस्तावावर विचार करण्याचे आणि त्या अधिका-याची भरती व नेमणूक करण्यासाठी योग्य ते निर्णय घेण्याचे अधिकार स्थायी समितीला दिले आहेत.

(३) ठराव ५२ अन्वये नेमलेल्या सदस्यांच्या समितीने, हिशेब व वित्त विभागाची संघटनात्मक रचना कशी असावी याबाबतही सल्ला द्यावयाचा आहे.

बाब क्र.(११): कार्यकारी मंडळाचा (फंक्शनल बोर्ड) कर्मचारी वर्ग.

ठराव (५९) : (१) ही बाबसुद्धा ठराव ५२ अन्वये नेमलेल्या सदस्यांच्या समितीकडे पाठवावी आणि तिने दिलेल्या सल्ल्यासह ह्याबाबीवर पुढील बैठकीत पुन्हा विचार करण्यात यावा असे प्राधिकरणाने ठरवले.

(२) प्राधिकरणाकडून ह्या प्रस्तावावर अंतिम विचार करण्यात येईपर्यन्त, आवश्यक असतील अशा तातडीच्या नेमणुका करण्याचे अधिकार अध्यक्षांना देण्यात आले आहेत. अशा रीतीने केलेली कार्यवाही कार्योत्तर मंजुरीसाठी प्राधिकरणास कळवण्यात आली पाहिजे.

बाब क्र.(१२): मुंबईतील जमिनीचा वापर करण्यासंबंधीच्या बाबी.

ठराव (६०): प्राधिकरणाने टिप्पणीवर विचार केला आणि पुढील सदस्यांच्या समितीकडे ही बाब निर्णयासाठी पाठवावी असा ठराव संमत केला:-

मुंबईचे महापौर -- अध्यक्ष.

मुख्य सचिव.

श्री व्ही. एस. महाडिक, अध्यक्ष, स्थायी समिति, मुंबई महानगरपालिका.

श्री एन.बी. ठक्कर, अध्यक्ष, सुधार समिति, मुंबई महानगरपालिका.

श्री सी. एस. मेहता, अध्यक्ष बेस्ट समिती.

श्री हंसराज भुगरा.

श्री पुष्पकान्त म्हात्रे.

श्री इशु अडवानी.

श्री सुधीर जोशी.

श्री मनोहर जोशी.

श्री एस. ए. खांडवानी.

श्री एस. जे. कोहली.

श्री व्ही. के. टेंबे.

श्रीमती कमला रामन.

श्री एस. एस. दिघे.

श्री जी. एम. बनातवाला.

श्री जी. बी. कानिटकर.

श्री जे. सी. अगरवाल, अध्यक्ष, मुंबई पोर्ट ट्रस्ट.

...७

आयुक्त, मुंबई महानगरपालिका.

आयुक्त, महानगर प्रदेश.

ही बाब, समितीच्या सल्ल्यासह प्राधिकरणाच्या पुढील बैठकीत प्राधिकरणासमोर ठेवण्यात यावी.

बाब क्र.(१२): कायदेशीर कर्तव्ये आणि कामे सोपविणे.

ठराव (६१) : प्राधिकरणाची कायदेशीर कर्तव्ये आणि कामे कार्यक्षम रीतीने आणि कार्यवाही अभिमुख अशा पध्दतीने पार पाडता यावीत म्हणून, प्राधिकरणाने पुढील निर्णय घेतले आहेत:-

(१) कर्तव्ये व कामे प्राधिकरणाच्या पुढील तीन स्तरांवर पार पाडण्यात येतील ते स्तर या प्रमाणे - स्थायी समिती, कार्यकारी समिती आणि जोडपत्रात तपशीलवार दिल्या प्रमाणेची कार्यकारी मंडळे.

(२) प्रत्येक अधिकार प्रदानाच्या बाबतीत घालून दिलेल्या संक्षिप्त पध्दतीच्या आधारे, प्राधिकरणाच्या संबंधित स्तरावरील समितीने, संबंधित काम । कर्तव्य कार्यक्षम रीतीने पार पाडण्यासाठी एक तपशीलवार कार्यपध्दति तयार करावी.

(३) अशा प्रकारे अधिकार सोपविलेल्या प्रमाणें स्थायी समिती, कार्यकारी समिती आणि कार्यकारी मंडळे यांनी केलेली कारवाई ही प्राधिकरणाने केलेली कारवाई असल्याचे समजण्यात येईल.

(४) या अधिकार प्रदानामध्ये स्पष्टपणे अंतर्भूत होत नसलेल्या सर्व कायदे-शीर अधिकारांची, त्यानंतर अन्यथा अधिकारप्रदान करण्यांत आले नसतील तर, प्राधिकारणाकडून अंमलबजावणी करण्यांत येईल.

(५) हे अधिकारप्रदान किंवा त्यानंतरचे कोणतेही अधिकारप्रदान करण्याविषयी कोणत्याही प्रकरणी संशय किंवा संदिग्धता निर्माण झाल्यास, त्याबाबतीत निर्णय घेण्यास केवळ प्राधिकरण हेच सक्षम असेल.

(६) प्राधिकरणाची कर्तव्ये, कामे किंवा अधिकार यावर ज्यामुळें परिणाम होईल अशी कोणतीही दुरुस्ती अधिनियमात करण्यात आल्यास, याद्वारे करण्यात आलेले संबंधित अधिकार प्रदान हे, प्राधिकरणाकडून सुधारित कर्तव्ये, कामे किंवा अधिकार सोपवण्यात येईपर्यन्त, तात्काळ रद्द झाल्याचे समजण्यात येईल.

...८

( जोडपत्र 'अ' )

: सदस्यांची सूची :

(१) डॉ. रफिक झकरिया, नगर विकास मंत्री.

(२) श्री नानालाल डी. मेहता, मुंबईचे महापौर.

(३) श्री एस. डी. चैाधरी, वित्त मंत्री.

(४) श्री एस. एस. तिडके, उद्योग मंत्री.

(५) श्री व्ही. एस. महाडिक.

(६) श्री हंसराज भुगरा.

(७) श्री पुष्पकान्त ए. म्हात्रे.

(८) श्री सुधीर जोशी.

(९) श्री सोहनसिंग कोहली.

(१०) डॉ. एस. जी. परुळेकर.

(११) श्री डी. के. खानविलकर.

(१२) श्री व्ही. के. पाटील.

(१३) श्री डी. एस. पाटील.

(१४) श्री व्ही. के. टेंबे.

(१५) श्रीमती कमला रामन.

(१६) श्री एस. एस. दिघे.

(१७) श्री जी. एम. बनातवाला.

(१८) श्री डी. बी. पाटील.

(१९) श्री एस. डी. बसवंत.

(२०) श्री एस. एस. वागळे.

(२१) श्री जे. सी. अगरवाल.

(२२) श्री एस. एस. मुथन्ना.

(२३) श्री एस. ए. खांडवानी.

(२४) श्री मनोहर जी. जोशी.

(२५) श्री हशु अडवानी.

(२६) श्री सी. एस. कोरिया.

(२७) श्री एस. जी. के. मूर्ती.

(२८) श्री बी. जी. देशमुख.

...९

( जोडपत्र 'ब' )

दिनांक १४ फेब्रुवारी १९७६ रोजी, भरावयाच्या चौथ्या बैठकीतील, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. रफीक झाकरिया यांचे भाषण.

0000000

या बैठकीत आपले स्वागत करण्यास मला आनंद होत आहे. बहुधा ही बैठक अगदी अल्पमुदतीच्या सूचनेनेच बोलावण्यात आलेली आहे आणि कार्यसूची विषयींचे कागदपत्रही आपणास गेल्या काही दिवसापूर्वीच मिळालेले आहेत. मुंबई नगर वाहतूक प्रकल्पासाठी, जागतिक बँकेच्या मूल्यमापन विषयक मंडळाने दिलेल्या चालू भेटीच्या संबंधातील कामांत कार्यालय गुंतलेले होते हेच त्याचे कारण होय. यापुढे आम्हास आपल्या सर्वसाधारण विनियमांचे पालन करता येईल. म्हणजेच, बैठकीपूर्वी १० दिवस आधी कागदपत्र आपणाकडे पाठवण्यात येईल याची मला खात्री वाटते.

२. जागतिक बँकेच्या मंडळाने आपले काम जवळ जवळ संपवलेले असून काही दिवसातच त्यांची भेट आटोपेल असे वाटते. या प्रकल्पाची प्रगती व संबंधित कर्ज या विषयी त्या मंडळाने बरीच आस्था दर्शविली आहे. आम्हास असे वाटते की, जुलै १९७६ मध्ये सुरु होणाऱ्या बँकेच्या आर्थिक वर्षामध्ये हे कर्ज मिळेल आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे त्याचा ओघ वाहू लागेल अशी अपेक्षा आहे. मंडळाच्या सदस्यांनी आपल्या कामाच्या वेळी, या बाबतीत जी आस्था दाखवली त्याबाबत मी मंडळाच्या सदस्यांचे आभार मानू इच्छितो.

३. तिन्ही कार्यकारी मंडळेसुध्दा मला दिनांक ७ रोजी संयुक्तपणे भेटली होती. यामुळें त्या सर्वांना व्यक्तिशः भेटण्याची मला संधि मिळाली आणि त्यातील प्रत्येक व्यक्तीची इतर सर्वांशीही ओळख झाली. ती आता आपापल्या कामावर लक्ष केंद्रित करतील. परंतु, दर काही महिन्यांनी मंडळाच्या संयुक्त बैठकी व्हाव्यात असे मला वाटते. त्यामुळे, एका प्रदेशाचे सर्वसाधारण तत्वावर नियोजन हाती घेता येईल व प्रत्येक क्षेत्र दुसऱ्या क्षेत्राशी सुसंगतपणे सलग्न होऊ शकेल.

४. आजच्या बैठकीच्या कार्यसूचीमध्ये, प्रादेशिक विकासाचा हितसंबंध असलेले तीन प्रमुख मुद्दे आपणास दिसून येतील. सर्वात मोठा व बहुधा सर्वात महत्वाचा मुद्दा सरकारी व नगरपालिकेच्या जमिनीवर असलेल्या गलिच्छ वस्त्यातील रहिवाशांशी संबंधित आहे. ह्या वस्त्यांमध्ये गलिच्छ वस्ती सुधारणा मंडळाने यापूर्वीच सुधारणा हाती घेतलेल्या असून, इष्ट त्या आराखड्यानुसार आणि समाधानकारक अशा स्वरुपाची राहती घरे पुन्हा बांधण्यासाठी मंडळ त्या रहिवाशांना मदत करीत आहे.

दर वस्तीसाठी रुपये ४,००० याप्रमाणे एक कोटी रुपये रक्कम खर्च केल्यानंतर दर वर्षी अशा २,५०० नवीन सुधारित युनिटस् तयार होऊ शकतील. आळीपाळीने आगामी वर्षांमध्ये, तेवढयाच रकमेमध्ये आणखी अधिकाधिक वस्त्यांची पुनर्बांधणी करता येईल. राहण्याच्या जागा व सेवा या विचाराशी यामुळे सुसंगति राखता येईल व या गोष्टीमध्यें गेल्या काही काळापासून भारत सरकारने बरीच आस्था दर्शविलेली आहे, त्यामुळें तेथील रहिवाशांमध्यें स्वत:चे हितसंबंध राखण्याचे तत्व अवलंबिले जाते आणि त्यांना बचत करण्यास प्रोत्साहन मिळते. प्राधिकरणाला या विषयावर चर्चा करता येईल आणि अधिनियमाच्या कलम १८(१)(अ) च्या कक्षेतील पंचवार्षिक योजनांतर्गत योजना म्हणून विचार करण्यासाठी राज्य सरकारकडे पाठवण्याची त्याला शिफारस करता येईल.

५. दुसऱ्या एका महत्वाच्या कर्जाचा आपणास विचार करावयाचा असून, वाशी येथे उभारावयाच्या नवीन घाऊक बाजाराच्या बांधकामाचा वेग वाढविण्यासाठी हे कर्ज मफकोला द्यावयाचे आहे. यामुळें दक्षिण मुंबईच्या भागातील दाटी कमी होण्यास बरेच सहाय्य होईल आणि तेथील रस्त्यावरील, उपनगरांकडे व त्या पलीकडे कांदे व बटाटे घेऊन जाणाऱ्या व शहरात हा माल घेऊन येणाऱ्या मालमोटारींच्या दररोज होणाऱ्या वाहतुकीमुळे होणारी गर्दी कमी होण्यास मदत होईल. या उपाय योजनेमुळें आतापर्यन्त नवीन मुंबईची जेवढी वाढ झालेली आहे त्यापेक्षा अधिक वेगाने तिची वाढ निश्चितपणे होऊ शकेल.

६. आणखी आपण ज्या बाबीवर विचार करणार आहोत ती तिसरी बाब म्हणजे, भिवंडी व खोपोली नगरपालिकांनी त्यांच्या अधिकारक्षेत्रातील निवडक भागांच्या विकासाकरिता सुचवलेले दोन विशेष कार्यक्रम होत. त्यांनी हे कार्यक्रम राज्य सरकारमार्फत यापूर्वी हुडकोला सादर केले होते, परंतु हुडकोने सल्ला दिल्याप्रमाणे त्या कार्यक्रमांचा आणखी आढावा घेणे आवश्यक होते. तथापि ते कार्यक्रम क्षेत्र विकास योजनेच्या स्वरुपातील असल्यामुळे, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने ते विचारात घेणे योग्य ठरु शकेल असे वाटते. इमारतींच्या बांधकामाचा सध्याचा खर्च विचारात घेऊन, लहान लहान प्लॉट तयार करण्यासाठी त्यांच्या आराखड्यांची फेर आखणी करावी लागेल.

७. आजच्या कार्यसूचीवरील इतर बाबी प्राधिकरणाने अनुसरावयाच्या हिशेब ठेवण्याच्या पध्दतीशी आणि प्राधिकरणाखालील निरनिराळया समित्या व कार्यकारी मंडळे यांच्याकडे कायद्याने आणि प्रशासनिकरीत्या सोपविण्यात आलेल्या अधिकारांशी संबंधित आहेत.

...........